म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय कां० वा०
दा. क्र. ३०१५

# वसंतराव

IRBK-0103015
IRBK-0103015

# वसंतराय

...न. ग्रं. सं. ठाणें
...षय बाल- वाङ्मय
...नं. ५, ६४



ल. रा. गोडबोले

किंमत सहा आणे

कथामाला : १

# वसंतराय

लेखक

ल. रा. गोडबोले

साहित्यप्राज्ञ, एस्. टी. सी.; ठाणे.

*

प्रकाशक

मेसर्स जोशी आणि लोखंडे, पुणे.

IRBK-0103015

## अनुक्रम

१ पारेवाडींत

२ राक्षसी कुत्रे

३ दानशूर वसंतराव

४ तुरुंगांतील राजकन्या

५ सुनंदेचें स्वप्न

६ लग्नाची मागणी

७ वसंतनगर.

## वसंतराय

पहिली आवृत्ति : १९४९

कथानक
The Tinder Boxच्या आधारें

संपादक
शं. रा. देवळे,
७८ शुक्रवार पुणें २

मुद्रक
प्र. भा. काळे, प्रतिभा मुद्रणालय
३३५ शनिवार, पुणें २,

प्रकाशक
दे. श्री. जोशी आणि द. भ. लोखंडे
मिसर्स जोशी आणि लोखंडे यांचेसाठीं
३३५ शनिवार पेठ, पुणें २



# वसंतराय

## १. पारेवाडींत

फार फार पूर्वींची गोष्ट आहे. पारेवाडी हें एक लहानसें खेडेगांव होतें. वसंतराय हे त्या गांवचे एक तलाठी होते. बुद्धीनें ते फार हुशार होते; पण घरच्या गरीबीमुळें लहानपणीं त्यांना फारसें शिक्षण घेतां आलें नाहीं. मराठी सातवी पास झाल्यावर एक दोन वर्षांतच त्यांना त्या गांवीं तलाठ्याची नौकरी मिळाली. आतां वसंतराय पैसे मिळवूं लागले म्हणून त्यांच्या आईला धन्यता वाटली. वसंतरायांचे वडील वारल्यानंतर आईनेंच त्यांचें शिक्षण काबाडकष्टाचीं कामें करून केलें होतें.

आसपासच्या गांवीं ते वसुलीकरितां अधून मधून जात असत. कधीं कधीं त्यांना रानांतून जाण्याचा प्रसंग येई. असेच

ते एक दिवस लवकर जेवून बाहेर पडले. शेजारच्या गांवीं जात असतां त्यांना संध्याकाळ झाली. वाटेंत किर्र झाडी होती. भोंवतालीं कोठेंहि मनुष्यवस्ती नव्हती; परंतु तो रस्ता त्यांच्या माहितींतला होता. ते झपाटयानें चालले होते.

इतक्यांत एका झाडाखालीं त्यांना एक म्हातारी बसलेली दिसली. तिचे पांढरे केस डोळ्यांवरून पुढें आले होते. ती एक फाटकें व विटकें लुगडें नेसलीं होती. तोंडावर सुरकुत्या दिसत होत्या. शेजारीं एक मडकें व तिची वांकडी काठी पडलेली दिसत होती. म्हातारीचे ओठ थरथरत होते व लाळ खालीं गळत होती. तिला हे वसंतराय झपाटयानें चाललेले दिसले. ती कांपऱ्या आवाजांत म्हणाली,



"काय रे बाबा, कुठें जातोस तूं? मी येऊं कां तुझ्याबरोबर?"

"कुठें जायचं तुम्हांला आजी?" वसंतराय म्हणाले.

"पलीकडच्या गांवांत. तेवढी सोबत होईल बाबा तुझी." म्हातारी म्हणाली.

" मग चला ना माझ्याबरोबर. " ते म्हणाले.

म्हातारी काठी घेऊन उठली व हळू हळू चालूं लागली.

" बाबा, तुला उशीर नाहीं ना होणार ? किती रे त्रास घेतोस पोटाकरितां ! आतां वस्तीला तेथेंच राहाणार कां रे ? " म्हातारी म्हणाली.

" होय आजीबाई, मग काय करणार ! पोटाकरितां कांहींतरी काम हें केलेंच पाहिजे." वसंतराय म्हणाले.

" खरें आहे बाबा. पण काय रे, मी तुला पैसे मिळविण्याची दुसरी एखादी युक्ति सांगितली तर तूं करशील का ? " म्हातारीनें विचारलें.



" का नाहीं करणार आजीबाई ? तुमचे उपकारच होतील माझ्यावर असें कांहीं सांगितलेंत तर." ते म्हणाले.

" एक तर; तें पलीकडे वडाचें झाड आहे ना ? त्या झाडावर चढ. तें आंतून पोकळ आहे. त्यांत तुला उतरतां येईल. आंत तीन खोल्या आहेत. प्रत्येक खोलींत पेटीवर बसलेला एकेक कुत्रा आहे. मी देतें हें फडकें आंथर; त्यावर

तो कुत्रा बसेल; म्हणजे तुला पेटी उघडतां येईल. त्या पेटींतील हवे तेवढे पैसे तूं काढून घे. मला त्यांतील एकही पैसा नको. परंतु तूं माझें एक काम केलें पाहिजेस. शेवटल्या खोलींत माझी तपकिरीची डबी आहे तेवढी घेऊन ये. येतांनाहि तुला मुळींच त्रास पडणार नाहीं."

म्हातारीचें बोलणें ऐकून वसंतरायांना प्रथम आश्चर्य वाटलें. परंतु ही एखादी वनदेवता असेल अशी त्यांची कल्पना झाली; आणि तिच्या सांगण्याप्रमाणें त्यांनीं करण्याचें ठरविलें. ते म्हणाले,



"ठीक आहे आजीबाई, द्या तें फडकें मजजवळ. मी आंत जाऊन तुमचें काम अवश्य करीन."

इतकें बोलून वसंतराय तें फडकें घेऊन निघाले आणि वडाच्या झाडावर चढले. म्हातारी त्या वडाच्या झाडाजवळ बसून राहिली. झाडाच्या टोंकापर्यंत ते गेले तों खरोखरच त्या झाडांत त्यांना पोकळी दिसली. आंत डोकावून पाहातात तों तेथें त्यांना सगळाच चमत्कार दिसला.

# २ राक्षसी कुत्रे

त्या वडाच्या पोकळींतून दिव्यांच्या प्रकाशाचा झोत दिसत होता. आंत जणूं कांहीं रोषनाई केलेली होती. त्या प्रकाशांत वसंतरायांना आंत पायऱ्या उतरत गेलेल्या दिसल्या. आंत जाऊन आपण अडकणार तर नाहीं ना! असें त्यांच्या एकदां मनांत आलें. परंतु शेवटीं मनाचा धीर करून ते खालीं उतरूं लागले. म्हातारीनें दिलेलें फडकें त्यांनीं कमरेला बांधलें होतें. जिन्याप्रमाणें असलेल्या पायऱ्या सरासर उतरून ते खालीं आले. जिन्याच्या तळाशीं त्यांना एक मोठा थोरला दिवाणखाना दिसला. त्यांत जिकडे तिकडे दिवे होते आणि पंखे गरगर फिरत होते. तेथें आपल्याला फार वेळ घालवितां येणार नाहीं असा विचार त्यांच्या मनांत आला; आणि कोठें खोली दिसते कीं काय हें ते पाहूं लागले.

दिवाणखान्यांतच त्यांना एका खोलीचें दार दिसलें. जवळ जाऊन पाहातात तों तें नुसतें लोटलेलेंच होतें. आंत ढकलल्याबरोबर तें उघडलें. समोरच एक पेटी होती व त्यावर एक भयंकर कुत्रा बसलेला होता. त्याचे डोळे कपाएवढे मोठे



होते. त्यामुळें तो जास्तच भयंकर दिसत होता. वसंतरायांना प्रथम भीति वाटली; पण धीर करून त्यांनीं आपल्या कमरेचें फडकें सोडलें व पेटीशेजारीं आंथरलें. तावडतोब तो कुत्रा शेंपूट हालवीत खालीं उतरला; व फडक्यावर येऊन बसला. वसंतरायांनीं ती पेटी उघडली. तींत भरगच्च तांब्याचे पैसे भरलेले होते. त्यांना फार आनंद झाला. त्यांच्याजवळ पिशवी होती ती त्यांनीं त्या पैशांनीं तोंडोतोंड भरली; शिवाय थोडे पैसे धोतरांतहि बांधून घेतले व पेटीचें झांकण लाविलें. पेटी लावल्याबरोबर तो कुत्रा पुन्हां पेटीवर चढला व तेथें बसून राहिला. वसंतरायानीं तें फडकें उचललें व कमरेला बांधलें. इतक्यांत त्यांना जवळच दुसरें दार दिसलें.

हें दारहि लोटल्याबरोबर आंत उघडलें. वसंतराय आंत जाऊन



पाहातात तों त्यांना निराळाच प्रकार दिसला. या खोलींतहि एक पेटी असून तिच्यावर एक कुत्रा बसलेला होता. या कुत्र्याचे डोळे ताटाएवढे मोठे असल्यामुळें तो जास्तच भयंकर दिसत होता. वसंतरायांना आतां माहीत झालेलें होतें; त्यांनीं तें फडकें पेटीशेजारीं आंथरलें. तावडतोब तो कुत्रा त्या पेटीवरून उडी मारून

उतरला व त्या फडक्यावर येऊन बसला. वसंतरायांनीं ती पेटी उघडली तों दिव्याच्या प्रकाशांत आंतील नाणीं एकदम चमकलीं. त्या पेटींत सर्व चांदीचीं नाणीं होतीं. हीं चांदीचीं नाणीं आतां ठेवणार कोठें असें त्यांना वाटलें. एवढी चांदीचीं नाणीं आपणास मिळत असतांना तांब्याचीं नाणीं ठेवून काय करावयाचीं असें त्यांना वाटलें आणि त्यांनीं ते प्रथम घेतलेले तांब्याचे पैसे भराभर खिडकींतून बाहेर उडवून दिले. त्यांनीं पिशवी रिकामी केली आणि पिशवींत चांदीचीं नाणीं भरगच्च भरून घेतलीं. धोतरांत बांधून घेतलेले तांब्याचे पैसे फेंकून देऊन त्यांनीं चांदीचीं नाणीं घेतलीं. त्यांना फार आनंद झाला. त्यांनीं ती पेटी लावली; तेव्हां तो कुत्रा हळूच पेटीवर जाऊन बसला. वसंतरायांनीं रुमाल कमरेला बांधला. इतक्यांत पलीकडेच त्यांना तिसऱ्या खोलीचें दार दिसलें.

तेंहि लोटल्याबरोबर उघडलें.इतर खोल्यांपेक्षां यांत झगझगीत उजेड होता; आणि येथेंहि एका मोठ्या पेटीवर एक मोठा कुत्रा बसला होता. त्याचे डोळे गिरणींतील चाकाएवढे मोठाले होते;



आणि तो फारच भयंकर दिसत होता. परंतु आतां वसंतरायांना त्याची मुळींच भीति वाटली नाहीं. त्यांनीं चटकन् तें फडकें आंथरलें. एवढा भयंकर कुत्रा! पण तो सुद्धां शेंपूट हलवीत त्या फडक्यावर हळूच येऊन बसला. त्या पेटीवरच एक डबी होती. ती डबी उचलून वसंतरायांनीं आपल्या कोटाच्या आंतल्या खिशांत ठेवली; व ती पेटी उघडली. त्या झगझगीत दिव्याच्या प्रकाशांत त्यांना पेटींत सोन्याचीं नाणीं भरलेलीं दिसलीं. त्यांचा आनंद गगनांत मावेना. त्यांनीं आपल्याजवळ असलेलीं चांदीचीं नाणीं भराभर फेंकून दिलीं; आणि तीं सोन्याचीं नाणीं घेतां येतील तेवढीं भरून घेतलीं आणि ती पेटी बंद केली. त्याबरोबर तो कुत्रा त्या पेटीवर येऊन बसला.

आतां उशीर झाला असेल म्हणून ते झपाट्यानें परत फिरले.



परत जातांना त्यांनीं खोल्यांचीं दारें लोटून घेतलीं. वसंतराय भराभर जिना चढून वर आले. बाहेर काळोख पडला होता. त्यांच्याजवळ सोन्यांच्या नाण्यांचें बरेंच ओझें झालें होतें. खालीं उतरून पाहातात तों म्हातारी कोठेंच दिसेना. वसंतरायांनीं पुष्कळ शोधलें पण ती कोठेंच दिसेना. ते आतां घरीं परत फिरले.

# ३ दानशूर वसंतराय

घरीं पोचण्यास वसंतरायांना रात्रीचे दहा वाजले. रात्रीं ते तिकडेच वस्तीला राहाणार असें त्यांच्या आईला वाटत होतें. पण रात्रीचें सर्व आटोपून त्यांची आई नुकतीच पडली होती. तोंच तिला वसंताची हांक ऐकूं आली. तिनें दार उघडलें. ती म्हणाली, " कां रे वसंता, रात्रींच परत आलास ? "

वसंतराय म्हणाले, " तूं घरांत चल आई, सगळी गंमत सांगतों तुला. "



दोघेहि घरांत आल्यावर वसंतरायांनीं तीं सोन्याची लखलखीत नाणीं आईपुढें ठेवलीं. त्यांच्या आईला प्रथम आपण स्वप्नांत तर नाहींना, असें वाटलें. पण वसंतरायांनीं एकंदर हकिकत तिला सांगितली तेव्हां ती आश्चर्यानें थक्क झाली. देवानें आपणाला चांगलाच हात दिला आहे; असें तिला वाटलें.

वसंतराय चालून दमले

असतील म्हणून तिनें त्यांना एक कपभर दूध दिलें. रात्रीं वसंतरायांचें त्या द्रव्याबद्दलच विचार चाललेले होते; किती वेळ तरी त्यांना झोंप लागली नाहीं.

सकाळीं त्यांनीं प्रथम आपल्या नौकरीचा राजीनामा खरडला व त्याच दिवशीं त्यांनीं स्वतःकरितां सुंदर पोषाख खरेदी केला. वसंतरायांचा नूर एकदम बदलून गेला. एक दोन महिन्यांतच वसंतरायांचा एक छोटासा बंगला तयार झाला. त्यांनीं मिळालेल्या पैशांपैकीं कांहीं संस्थांना मोठमोठ्या देणग्या दिल्या. जिकडे तिकडे त्यांचें नांव दानशूर म्हणून प्रसिद्ध झालें. वसंतराय आतां एक सामान्य तलाठी राहिले नसून एक श्रीमंत व दानशूर सावकार म्हणून लोकांत मिरवूं लागले. एवढी संपत्ति त्यांना कोठें आणि कशी मिळाली याचा मात्र कोणाला सुगावा लागला नाहीं.

एके दिवशीं सकाळीं वसंतराय आपली जुनी ट्रंक उघडून बसले होते. त्यांतील जुने कपडे काढीत असतांना एक जुना कोट त्यांच्या हातीं लागला. तोच कोट घालून ते त्या वडाच्या झाडांत उतरले होते; याची त्यांना आठवण झाली. त्या कोटाच्या खिशांत त्यांना एक चांदीची डबी सांपडली. ही तपकिरीची डबी असून ही त्यांना म्हातारीला द्यावयाची होती. परंतु ती म्हातारी पुढें भेटलीच नाहीं ! त्यांनीं ती डबी उघडली. तिच्यांत सोनेरी रंगाची तपकीर होती. एक चिमूट घेऊन त्यांनीं ती ओढून पाहिली; तों काय चमत्कार !

थोड्याच वेळांत एक कुत्रा धांवत धांवत तेथें येऊन शेंपूट हालवीत उभा राहिला. त्याचे डोळे कपाएवढे मोठे होते. प्रथम वसंतराय घाबरून गेले; परंतु लवकरच तो कुत्रा त्यांच्या लक्षांत आला. तो कुत्रा मनुष्याप्रमाणेंच बोलूं लागला. तो म्हणाला, “ काय हुकूम, महाराज ? ”

हा कुत्रा आपलें काम करणार हें त्यांच्या लक्षांत येतांच त्यांनीं सांगितलें, “ थोडे पैसे घेऊन ये. ”

कुत्रा क्षणार्धांत तेथून निघून गेला आणि लवकरच एक पिशवीभर तांब्याचे पैसे घेऊन आला. ती पिशवी वसंतरायाजवळ ठेवून तो निघून गेला.

तीच तपकीर दोनदां ओढली असतां दुसऱ्या प्रकारचा कुत्रा धांवत येतो; असें त्यांना कळून आलें आणि तीनदां ओढली म्हणजे सर्वांत मोठा कुत्रा पुढें येऊन उभा राहतो; हेंहि त्यांना कळलें. हे कुत्रे आपल्या दर्जाप्रमाणें आपलीं कामें करतात हें त्यांनीं पाहिलें.

—

## ४ तुरुंगांतील राजकन्या

आतां वसंतरायांना पैशाची कधींच वाण पडली नाहीं. त्यांचे तीन कुत्रे त्यांना हवे तेवढे पैसे देण्यास समर्थ होते. वसंतरायांना लोकांमध्यें आतां बरीच मानमान्यता मिळालेली होती.

त्या देशाच्या राजाबद्दल बऱ्याच गोष्टी वसंतरायांच्या कानांवर येत होत्या. राजेसाहेबांनीं आतां दुसरें लग्न केलेलें होतें. त्यांना एक अत्यंत सुस्वरूप अशी मुलगी होती. तिचें नांव सुनंदा. ही राजकन्या आतां सावत्र आईच्या जाचांत सांपडलेली होती. राजघराण्यांत जन्मली असून तिचे लाड तर बाजूलाच राहिले पण सावत्र–आई तिचा छळ करीत असे.

घरांतील खाजगी गोष्टी आणि राजकारणांतील थोड्याफार गोष्टी राणीसाहेबांच्या तंत्रानें चालत. सुनंदेचे दिवसेंदिवस जास्तच हाल होत चालले. तिचें सौंदर्य नव्या राणीसाहेबांच्या डोळ्यांत खुपूं लागलें. सुनंदेचे आतां लग्नाचे दिवस जवळ येत चालले. तिच्या लग्नासंबंधींचें सर्व बोलणें राणीसाहेबांनीं आपल्याकडे घेतलें होतें. राजानें या बाबतींत मुळींसुद्धां बोलूं नये असें ठरलें होतें. राणीसाहेबांचा यामध्यें काय हेतु होता याबद्दल जिकडे तिकडे बरीच कुजबूज चाललेली होती.

ही गोष्ट वसंतरायांच्या कानांवर गेली. सुनंदा ही एक राजकन्या असून राजाकडे तिचे कसे हाल चालले होते; याबद्दल त्यांना बऱ्याच गोष्टी समजल्या. आपण आतां कितीहि श्रीमंत असलों तरी या बाबतींत आपणांस एक शब्दहि काढतां येणार नाहीं, हें त्यांना माहीत होतें. परंतु या बाबतींत त्यांचे विचार सुरूं झाले.

राजकन्येला आतां पुष्कळच लग्नाच्या मागण्या येऊं लागल्या; पण राणीसाहेब ‘ सध्यां सुनंदेचें लग्नच करावयाचें नाहीं ’ असें




ज्याला त्याला सांगत. सुनंदा आपल्या दासींच्या बरोबर फिरावयास निघाली कीं कित्येक बायका तिच्याकडे टकमका पाहात. खरोखर ती रूपानें फार सुंदर होती; परंतु तिच्या तोंडावर काळजी दिसे. दासी तिचें मनरंजन करण्याचा प्रयत्न करीत. परंतु मनांतून ती नेहमी कष्टी असे. लोकांनीं तिचें गुणवर्णन केलेलें राणीला मुळींच खपत नसें. तिचें वाढतें सौंदर्य लोकांच्या नजरेस पडून जिकडे तिकडे तो चर्चेला विषय झाला आहे; हें राणीला आवडत नव्हतें.

याला कांहींतरी युक्ति करण्याचें राणी ठरवीत होती. एकाद्या गोषामधील स्त्रीप्रमाणें तिला ठेवावें असें राणीला वाटे; पण तेंहि तिला योग्य दिसेना. शेवटीं तिच्याकरितां राणीनें एक तुरुंग बांधून घेतला. त्याला तांब्याचे गज होते. सुनंदेला या तुरुंगांत ठेवण्यांत आलें. तिनें येथून कधींहि बाहेर येऊन कोणत्याहि राजपुत्राच्या कधींच दृष्टीस पडूं नये असें ठरलें. सुनंदे-साठीं आपण उत्तम राजपुत्र निवडणार; असें राणीनें जाहीर केलें. तिच्या लग्नाची सर्व व्यवस्था राणीनें करण्याचें ठरविलें. परंतु यांत तिचा कांहींतरी दुष्ट हेतु असावा; असा सर्वांनाच संशय येत होता. सुनंदेची होत असलेली ही कुचंबणा

वसंतरायांना कळली होती आणि त्याना राणीबद्दल तिरस्कार वाटत होता. ते या बाबतींत विचार करूं लागले; आणि कांहींतरी उपाय योजना करूं लागले.

## ५ सुनंदेचें स्वप्न.

आपल्या घरांत आतां सून यावी असें वसंतरायांच्या आईला वाटत होतें. वसंतरायांचा दर्जा आतां खूपच वाढला होता. त्यांना पुष्कळ मुली सांगून येत होत्या; परंतु त्यांच्या पसंतीस एकहि मुलगी येत नव्हती. शेवटीं एके दिवशीं एक नवीन मुलगी आपण दाखवावयास आणणार असें वसंतराय म्हणाले. मुलगी फारच सुंदर आणि दोघांनाहि पसंत पडण्यासारखी होती, असें त्यांनीं सांगितलें; पण ती फार बड्या घरची असल्यामुळें मिळण्यास



कठीण आहे असेंही ते म्हणाले. आई त्यावेळीं कांहींच बोलली नाहीं.

रात्र झाल्यावर वसंतराय मध्यंतरीं जागे झाले व जिकडे तिकडे सामसूम आहे असें पाहून त्यांनीं आपली तपकीरीची डबी काढली; आणि तपकीर घेऊन लागोपाठ दोन चिमटया ओढली. त्याबरोबर तांटाएवढे डोळे असलेला एक कुत्रा धांवत आला. वसंतराय म्हणाले, "आतांच्या आतां कोणास न कळवितां तांब्याच्या तुरुंगांत जा आणि राजकन्या निजली असेल तिला पलंगासुद्धां घेऊन ये."

वसंतरायांचा हुकूम होतांच तो कुत्रा धांवत धांवत निघाला आणि अर्ध्या तासाच्या आंत राजकन्येला पलंगासुद्धां घेऊन आला. वसंतरायांनीं आपल्या आईला बोलाविलें. ते म्हणाले, "आई, तुला मुलगी पाहावयाची आहे ना? पाहा तर".

त्यांच्या आईला पलंगावर स्वस्थपणें निजलेली एक सुस्वरूप राजकन्या दिसली. थोडयाच वेळांत ही राणीसाहेबांची सावत्र मुलगी आहे हें तिला कळलें. तिच्याबद्दल त्यांच्या आईनें पुष्कळ गोष्टी ऐकल्या होत्या. वसंतानें हें काय कारस्थान आरंभिलें आहे, याची तिला भीति वाटूं लागली. ती म्हणाली, "अरे बाबा, या फंदांत पडूं नको. नसतें संकट तूं ओढवून घेशील".

"तें पाहूं आपण पुढें" असें म्हणून वसंतरायांनीं त्या

राजकन्येला परत घेऊन जाण्यास कुत्र्याला हुकूम केला; त्याप्रमाणें तो कुत्रा घेऊन गेला.

सकाळीं राजेसाहेब आणि राणीसाहेब सुनंदेच्या भेटीला आले तेव्हां ती भेदरलेली दिसली. ती म्हणाली, "मला काल भयंकर स्वप्न पडलें. एक मला मोठा कुत्रा मला पलंगासुद्धां उचलून नेत आहे असें मी स्वप्नांत पाहिलें. मी यापुढें तुरुंगांत निजणार नाहीं."

परंतु राणीसाहेब म्हणाल्या, "बाळ, तुला घाबरण्याचें कांहीं कारण नाहीं. आज तुझ्याजवळ दोन दासी रात्रीं जागत बसतील आणि तुला भीति वाटली कीं त्यांना सांग".

याप्रमाणें दोन दासींनीं रात्रीं सुनंदेजवळ राहावयाचें आणि सुनंदेनें पूर्वीप्रमाणेंच त्या तुरुंगांत निजावयाचें असें ठरलें.

इकडे वसंतरायांच्या आईनें अशी गोष्ट पुन्हां न करण्याबद्दल वसंताला बजावलें. परंतु वसंतराय म्हणाले, "जर सुनंदेची त्या तांब्याच्या तुरुंगांत कुचंबणा होत असेल तर त्यांतून तिला सोडविणें हें आपलें काम आहे; असें मला वाटतें. तिच्याशीं लग्न करण्याचा माझा आग्रह नाहीं. तरीहि तिला या बाबतींत आज कांहीं विचारून पाहूं हवें तर".

त्यांच्या आईस तें योग्य वाटेना. परंतु कुत्र्यांच्या सामर्थ्यानें वसंतरायांना आतां चांगलाच धीर आला होता.

---

## ६ लग्नाची मागणी

दुसऱ्या रात्रीं सुनंदेजवळ दोन दासी सोबतीला होत्या. त्यामुळें सुनंदेला स्वस्थ झोंप लागली होती. त्या दासींना एक कल्पना सुचली. त्यांनीं एक पिशवी घेऊन तींत आतिशय बारीक अशी रांगोळी भरली. त्या पिशवीला एक भोंक पाडून ठेवलें आणि ती पिशवी राजकन्येच्या पलंगाला बांधून पलंगाखालीं लोंबती ठेवली. खरोखरच सुनंदेला स्वप्न पडलें, आणि त्याप्रमाणें कांहीं प्रकार झाला तर ती कोठें जातें; हा पत्ता तरी नेमका समजावा याकारितां ही युक्ति त्यांनीं केली होती. रात्रीं एक वाजून गेल्यावर दोघींहि दासींना झोंप येऊं लागल्यामुळें आपल्या पथाऱ्या पसरून त्या निजल्या; व थोडयाच वेळांत त्यांना गाढ झोंप लागली.

इकडे वसंतरायांनीं दुसऱ्या रात्रींहि तपकीर दोन वेळां ओढली. त्याबरोबर तो कुत्रा तेथें हजर झाला. आदल्या दिवसाप्रमाणें त्या कुत्र्याला त्यांनीं राजकन्येला पलंगासुद्धां आणण्यास सांगितलें. कुत्रा राजकन्येस घेऊन आला. पलंगावर सुनंदा स्वस्थ झोंपलेली होती. परंतु पलंग खालीं ठेवतांच ती जागी झाली आणि घाबरून उठली. वसंतराय जवळच होते. ते म्हणाले, “ सुनंदाबाई, तुम्हीं मुळींच घाबरूं नका. तुम्हांला कांहींएक इजा होणार नाहीं. राजेसाहेबांनीं तुम्हांला बाहेर

पडण्यास बंदी केली आहे, हें आम्हांला माहीत आहे. पण तुम्हांला तेथून बाहेर पडावेसें वाटत नाहीं कां ?"

"पण मला येथें कोणीं आणिलें ? राजेसाहेबांना तुमचें कारस्थान कळलें तर ते तुम्हांला फाशीं देतील. मला तावडतोब परत नेऊन ठेवण्याची व्यवस्था करा" सुनंदा म्हणाली.

"काल येथें आणल्याची तुम्हांला कल्पना नव्हती. तुम्हांला पलंगासुद्धां येथें आणणें कोणालाहि शक्य नाहीं. तुम्हांला तुमच्या सावत्र आईचा जाच फार होतो असें ऐकलें आहे. त्यांतून तुम्हांला सोडविलें तर तुमची हरकत नाहीं ना ?" वसंतराय म्हणाले.

"खरेंच, ही गोष्ट तुम्हांला शक्य होईल कां ? राजेसाहेबांनाहि जें करतां येत नाहीं तें तुम्हांला करतां येईल ?" सुनंदेनें आश्चर्यानें विचारलें.

वसंतरायांचा एकंदर पराक्रम पाहून सुनंदेला आश्चर्य वाटलें; आणि त्यांच्याबद्दल आदर वाटूं लागला. आपलें हित पाहाणारे वसंतराय एकटेच दिसतात; आणि त्यांना तें शक्य दिसतें; यामुळें तिला आनंद वाटत होता. राजसत्तेंत जें सामर्थ्य नाहीं तें या एका सामान्य मनुष्यांत तिला उघड दिसत होतें. वसंतराय दिसण्यांत सुंदर होते. त्यांच्याशीं आपलें लग्न झालें तर आपण सुखी होऊं; असें सुनंदेस वाटूं लागलें. वसंतराय म्हणाले, "तुमच्याकरितां राणीसाहेब आतां कांहीं स्थळें पाहात आहेत ना ?"

सुनंदेनें खालीं मान घातली. तिच्या डोळ्यांतून अश्रू ठिबकूं

लागले. मायलेकांना सुनंदेचा वृत्तांत माहीत होतांच; तिची असहाय्यता दोघांनाहि दिसत होती.

वसंतरायांनीं कुत्र्याला तो पलंग परत घेऊन जाण्यास सांगितलें.

वसंतराय म्हणाले, "सुनंदाबाई, तुमचा पलंग आतां जागचे जागीं जाईल. तुम्हीं निर्धास्तपणें पलंगावर पडून राहा. तुम्हांला मुळींच इजा होणार नाहीं."

पलंग खरोखरच त्या तांब्याच्या तुरुंगांत जागच्या जागीं गेला; तो कोणी नेला हें सुनंदेला कळलेंहि नाहीं. तेथें दोघींहि दासींना गाढ झोंप लागली होती. सुनंदेच्या जिवांत जीव आला. थोडा वेळ ती झाल्या गोष्टींचा विचार करीत होती अखेर त्या विचारांतच तिला झोंप लागली.

---

## ७ वसंतनगर

उजाडल्यावर दासींनीं सुनंदेला विचारलें, "सुनंदाताई, काल नाहीं ना कांहीं स्वप्न पडलें?"

सुनंदा म्हणाली, "नाहीं बाई, काल तुम्हीं होतां, म्हणून मला गाढ झोंप लागली होती." सुनंदेला रात्रीचा प्रकार लपवावयाचा होता.

पलंगाला बांधून ठेवलेल्या रांगोळीच्या पिशवीकडे दासींचें लक्ष गेलें. पिशवींतील रांगोळी बरीच कमी झालेली होती. त्यांनीं एकमेकींकडे पाहिलें आणि त्या सुनंदेस सांगून बाहेर पडल्या. बाहेर ती रांगोळीची रेघ बरीच लांबपर्यंत गेलेली त्यांना दिसली. सुनंदाबाई कांहींतरी लपवीत आहेत, हें त्यांना कळलें. खरा प्रकार आपण उघडकीस आणिला तर राणीसाहेबांकडून आपणाला मोठें बक्षीस मिळेल ही त्यांना खात्री होती. त्यांनीं ती हकीगत राणीसाहेबांना सांगितली. राणीसाहेबांनीं ताबडतोब दोन शिपायांना बोलाविलें आणि म्हणाल्या, " आतांच्या आतां रांगोळीची रेघ जेथें नेईल तिकडे जा. ज्या घराशीं ती रेघ जाईल तेथील मनुष्यास बेड्या घालून पकडून आणा."



ते दोघे शिपाई बरोबर वसंतरायांच्या बंगल्यांत आले. वसंतराय नुकतेच सकाळचे कार्यक्रम उरकून बसले होते. शिपाई पाहातांच त्यांच्या पोटांत धस्स झालें; त्यांची आई तर फारच घाबरली. ती म्हणाली, "वसंता, काय रे बाबा झालं हें !"

वसंतराय म्हणाले, "आई, तूं मुळींच घाबरूं नको. ईश्वराच्या कृपेनें सर्व कांहीं ठीक होईल. एका अनाथ झालेल्या मुलीला न्याय मिळवून देण्याकरितांच मी सर्व कांहीं केलें आहे. हें माझें सत्कृत्य ईश्वराकडे रुजू आहे."

शिपायांनीं वसंतरायांना हातकड्या घातल्या. आई म्हणाली, "बाळ वसंत, जपून राहा बरं." तिच्या डोळ्यांत पाणी आलें. झालें ! शिपाई वसंतरायांना घेऊन निघून गेले.

राणीसाहेबांनीं सगळ्या गोष्टी राजेसाहेबांच्या कानांवर घातल्या आणि या गुन्ह्याला फांशीची शिक्षा द्यावी असें आपलें मत दिलें. राजेसाहेबांनींहि तें मान्य केलें.

दोन दिवसांनीं वसंतरावांना फांशीं द्यावयाचें असें ठरलें, आणि तें जिकडे तिकडे जाहीर झालें. त्यांच्या आईच्या कानांवर ही गोष्ट गेली. तिला अत्यंत वाईट वाटलें. एकच मुलगा आणि तोहि अशा प्रकारें जाणार; या विचारानें तिला वेड लागण्याची वेळ आली. ती एकदां तुरुंगांत वसंताला भेटून आली; पण वसंताचें मन खंबीर होतें. त्याचें एक सांगणें होतें, "आई, तूं मुळींच काळजी करूं नको. शेवटीं सर्व कांहीं ठीक होईल."


फांशीचा दिवस उजाडला तरी वसंतरायांचा धीर सुटला नव्हता. सर्व लोकांना आश्चर्य वाटलें. सुनंदेस अत्यंत वाईट वाटत होतें. तिला एकच आशा होती पण तीहि आतां नाहींशी होणार आणि राणीसाहेब कांहींतरी कपट करून आपलें सर्व आयुष्य मातीमोल करणार हें तिला स्पष्ट दिसूं लागलें.

खास राणीसाहेबांच्या आज्ञेवरून सुनंदेला सर्व मंडळींबरोबर फाशीच्या ठिकाणीं हजर राहण्यास सांगितलें होतें. राजेसाहेब व आणि राणीसाहेब दोघे एका कोचावर विराजमान झालीं. सर्व तयारी झाली. वसंतरायांना बोलावण्यांत आलें. आतां अगदीं थोडा वेळ राहिला. वसंतरायांना त्यांची शेवटची इच्छा विचारण्यांत आली. ते म्हणाले, " माझ्या आईला घेऊन या आणि माझी तपकिरीची डबी आणण्यास सांगा. "

आईला भेटण्याची इच्छा सर्वांनीं कबूल केली. तपकीर ओढण्याची त्यांना काय लहर आली; याबद्दल मात्र सर्वांना आश्चर्य वाटलें.



तपकिरीची डबी मागितल्यावर त्यांच्या आईला थोडा धीर आला. परंतु आतां तिचा काय उपयोग होणार ! असें तिला वाटलें. तेथें आल्यावर फांशीची तयारी पाहून आपल्याला आतां भयंकर प्रसंग पाहावा लागणार असें तिला वाटलें. वसंतरायांनीं तपकिरीची डबी घेतली. प्रथम एकदां ओढली, नंतर दोनदां ओढली व नंतर तीनदां ओढली. त्याबरोबर तिन्ही कुत्रे तेथें धांवत येऊन वसंतरायांच्या समोर उभे राहिले. वसंतराय म्हणाले



" चला, राजाराणीचा कोच उचला. शिपायांना उचला. बाक उचला." हुकूम होतांच कुत्र्यांनीं बाक उचललें. पळापळ झाली! राजाराणी घाबरून गेली. राणी म्हणाली, " नका नका, त्यांना फाशी देऊं नका. आम्ही शरण आलों आहों."

सुनंदेनें तेवढ्यांत संधी साधून म्हटलें, " राजेसाहेब, मी यांच्याशीं लग्न करणार."

" कर कर. खुशाल लग्न कर बाई त्यांच्याशी." राणीसाहेब म्हणाल्या.

वसंतरायांचा प्रताप सर्वांना कळला. वसंतरायांनीं पुन्हां हुकूम सोडून आलेले अरिष्ट नाहींसें केलें. थोड्याच दिवसांत वसंतरायांचें सुनंदेशीं मोठ्या थाटांत लग्न झालें असा प्रतापी वसंतराय आपल्याला जांवई मिळाल्याबद्दल राजेसाहेबांना आनंद वाटला. राणीसाहेबांचा बेत फोल ठरला. त्या आतां वसंतरायांना आणि

त्यांचेबरोबर सुनंदेलाहि भिऊन राहूं लागल्या. सर्व मंडळीच्या आग्रहावरून वसंतरायांच्या पारेवाडीला आतां वसंतनगर नांव देण्यांत आलें.



म. ग्रं. सं. ठाणे,
दा. क्र. २०१५ नों. दि.
वि. लो. पा.

नवीन अभ्यासक्रमाप्रमाणें तयार केलेलीं पुस्तकें

भाग १ ते ५ ] **बालगोष्टी** [ किंमत प्रत्येकीं ६ आणे

लेखकः— **शं. रा. देवळे** आणि **रं. म. जोशी**

खूप खूप चित्रें.
दोन रंगीं आकर्षक मुखपृष्ठ.
मोठ्या टाइपांतील रेखीव छपाई.
शिक्षणतज्ज्ञांचे उत्तम अभिप्राय.
विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यासारखीं.
पुरवणीवाचन म्हणून वापरण्यास उपयुक्त.
विद्यार्थ्यांना वाचायला या गोष्टी फार आवडतील.
शिक्षकांना मुलांना सांगण्यासाठीं नव्या गोष्टी यांत मिळतील.

---

नवीन अभ्यासक्रमाप्रमाणेंपुस्तकें तयार केलेलीं

बालवर्ग किंमत ६ आणे ] **बालगाणीं** [ इयत्ता पहिली किंमत ६ आणे

( मुलांसाठी नवी गाणी )

संपादकः—**शं. रा. देवळे**

शिक्षक, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचें मुलांचें हायस्कूल, पुणें २.

प्रा. **ग. ह. पाटील**, बी. ए., बी. टी. यांची प्रस्तावना.

प्रा. **मायदेव**, श्री. **गोपीनाथ तळवलकर**, प्रा. **ग. ह. पाटील**, प्रा. **वि. म. कुलकर्णी**, **शांता शेळके**, प्रा. **भ. श्री. पंडित** इत्यादि कवींचीं पंधरा पंधरा निवडक बालगीतें, अभिनयगीतें, लोकगीतें.

**खूप खूप चित्रें : मोठा टाईप : दोन रंगी मुखपृष्ठ : आकर्षक छपाई**

पत्ताः—**मेसर्स जोशी आणि लोखंडे**, ३३५ शनिवार पुणें २.

# मुलांना आवडणारीं पुस्तकें

* विक्रमाची देणगी ५ आणे
* दामूचें दैव ८ आणे
* चिमण्याची चलाखी ८ आणे
* किशोरची किमया ८ आणे
* गारांचा पाऊस ४ आणे
* पैशांचा पाऊस ६ आणे
* मार्गदर्शक व्यवसाय इ. १ ली ४ आणे
* मार्गदर्शक व्यवसाय इयत्ता २ री ८ आणे
* मार्गदर्शक व्यवसाय इयत्ता ३ री ८ आणे
* आवडत्या लोककथा १२ आणे
* गरिबाची भेट ४ आणे
* पिंजऱ्यांतील प्राण ४ आणे
* बालगोष्टी भाग १ ते ५ प्रत्येकीं ६ आणे
* भाग्यवान दौलती ४ आ
* बडा दादा ८ आ
* छोट्या छब्या ८ आ
* वासंती आणि वाघोबा १०
* कुंदाचें भाग्य ८
* येसू आणि केसू ८
* स्वावलंबी लेखी व्यव इ. ४ थी ९
* स्वावलंबी लेखी व्यवस इ. ५ वी १४
* स्वावलंबी लेखी व्यवस इ. ६ वी —
* स्वावलंबी लेखी व्यवसा इ. ७ वी १५
* खोडकर उषा १०
* बालगाणीं भाग १ व २ प्रत्येकीं ६

हीं पुस्तकें सर्व पुस्तकविक्रेत्यांकडे अथवा खालील पत्त्यावर मिळतील.

देवळेबंधु, सरस्वतीसदन, ७८ शुक्रवार पेठ, पुणें २.

# मुलांना आवडणारीं पुस्तकें

* विक्रमाची देणगी ५ आणे
* दामूचें दैव ८ आणे
* चिमण्याची चलाखी ८ आणे
* किशोरची किमया ८ …
* गारांचा पा…
* … …तराय गरिबीमुळें …ग पडला. देवतेनें येऊन द्रव्याचा खजिनाच त्याच्या स्वाधीन केला. बंदींत ठेवलेल्या राजकन्येची त्यानें सुटका केली पण शेवटीं तोच राजाच्या तावडींत सांपडला. तेथेंहि त्यानें कसा प्रभाव दाखविला तें वाचतांना तुम्हांला गंमत वाटेल.

किंमत सहा आणे

२. विठूचें चातुर्य :

विठू हा एक गरीब पण मेहनती …ी त्याच्या श्रमांचा फायदा फुकटांत घेणारे पुष्कळ लोक त्याला भेटले. पण त्या सर्वांची खोड त्यानें कशी हुशारीनें मोडली, तें या पुस्तकांत वाचा.

किंमत सहा आणे

* भाग्यवान दौलती ४ आ…
* बडा दादा ८ आण…
* छोट्या … रंगी मुखपृष्ठें

३. कुंदाचें भाग्य :

कुंदा ही सावत्र आईच्या कचाट्यांत सांपडलेली एक राजकन्या सावत्र आईनें कपटानें तिला रानांत सोडलें. सावत्र आईनें पुन्हा पुन्हा आणलेल्या संकटांतून ती कशी बचावली आणि अखेर… ही गोष्ट तुम्हांला फारच आवडेल.

किंमत आठ आणे.

४. खोडकर उषा :

राजकन्या उषा प्रत्येक गोष्टींत कांहींतरी खोड काढायची. मग ती आईनें केलेली कोशिंबीर असो कीं वडिलांनीं आणलेलें अत्तर असो ! लग्नाच्या वेळीं तिला कोणताच राजपुत्र पसंत पडेना. शेवटीं राजानें तिचें लग्न एका भिकाऱ्याशीं लावून दिलें पण… हें पुस्तक संपविल्याशिवाय खालीं ठेवणार नाहींत तुम्ही !

किंमत दहा आणे.

प्रकाशक :— लोखंडे, पुणें २.

IPBK-0103015
IRBK-0103015